मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती या कार्यालयाच्या नियत अस्थायी आस्थापनेवरील पदांना दि. ०१/०३/२०१८ ते दि.३०/०९/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक- मुदतवाढ -२०१८/(३७ /२०१८) मोप्र-(२)

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक :- ०९/०५/२०१८

<u>संदर्भ :-</u> १) शासन निर्णय क्र, जलसंपदा विभाग, क्रमांक- मुदतवाढ -२०१८/(३७ /२०१८) मोप्र (२), दि. १६ /०२ /२०१८

२) मुख्य अभियंता , जलसंपदा विभाग, अमरावती यांचे पत्र.क्र. अे-१/प्राका/मुप्र २/ बृधाक्र-१५३९/१२४/२०१७, दिनांक २१/०३/२०१८

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्रक्र.८/१६/ आ.पु.क , दिनांक ५ मार्च, २०१८

२) शासन निर्णय , जलसंपदा विभाग क्र.आढावा १००२/(प्र.क्र.३३५/२००२)/ आ(प्रशि), दि.६/२/२००३

<u>प्रस्तावना :-</u>

मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती या कार्यालयातील सर्व पदांची निर्मिती सुधारीत आकृतीबंधानुसार संदर्भाधिन क्रमांक ४ येथील शासन निर्णय दिनांक दि.६/२/२००३ अन्वये निश्चित करण्यात आली आहे. सदर नियत अस्थायी आस्थापनेवरील ३० पदांना दिनांक २ ८/०२/२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास संदर्भीय क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली होती. संदर्भ क्रमांक ३ चे वित्त विभागाचे शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतिबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यावर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतिबंधात करण्यात आलेला नाही अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना ते दिनांक ०१/०३/२०१८ ते ३०/०९/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

<u>शासन निर्णय :-</u>

संदर्भ क्र. २ अन्वये प्रस्तावित केल्यानुसार मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांनी त्यांचे कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील ३० पदांना सोबतच्या परिशिष्ट - अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे दिनांक ०१/०३/२०१८ ते ३०/०९/२०१८ पर्यंत मुदतवाढ खालील अटींचे अधिन राहून देण्यात येत आहे.

१) उपरोक्त सर्व पदे विभागाने प्रस्तावित केलेल्या कालावधीत कार्यरत असतील.

२) ही पदे आकृतीबंधानुसार मंजूर असतील व सहा महिन्याहून अधिक कालावधीसाठी रिक्त नसतील.

३) उपरोक्त कार्यालयातील खर्च, “”मागणी क्रमांक आय-५ (नियत अस्थाई आस्थापना), मुख्य लेखाशीर्ष- ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च,८० सर्वसाधारण, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणूका, (०४) योजनेतर- वेतनावरील खर्चासाठी

भाग भांडवली अंशदान , (०४)(०२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (४७०१ आय १७१) " या लेखाशीर्षाखाली महामंडळास मंजूर असलेल्या नियत अस्थाई आस्थापनेच्या वेतनाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४) हे आदेश वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्रक्र.८/१६/आ.पु.क, दिनांक ०५/०३/२०१८ अन्वये प्रशासकीय विभागास दिलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

सदर शासन निर्णय , महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०५०९१८१३०३१७२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सहपत्र- परिशिष्ट 'अ'

Abhay Keshaorao Yedsikar

Digitally signed by Abhay Keshaorao Yedsikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5724dd2e45895f7c2ab554c8d0b0041f388e5f3974 67c37bb907e6cc635bd0fd, cn=Abhay Keshaorao Yedsikar
Date: 2018.05.09 18:14:00 +05'30'

(अभय येडसीकर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत- सहपत्रासह-

१. महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता) नागपूर,
२. महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य, (लेखापरीक्षा) नागपूर,
३. वित्त विभाग, व्यय-१२, मंत्रालय, मुंबई,
४. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर
५. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत शासन निर्णयान्वये मंजूरी दिलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त इतर अधिकारी /कर्मचा-यांची वेतन व देयके अदा केल्यास तसेच या निर्णयान्वये दिलेल्या मंजूरीच्या प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या चुकीचा अर्थ लावून अन्य अधिकारी/कर्मचारी यांची वेतन देयके अदा केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांवर राहील, याची कृपया नोंद घ्यावी.
६. मोप्र-(२) कार्यासन, संग्रहार्थ.

परिशिष्ट अ

शासन निर्णय क्र. मुदतवाढ -२०१८/(३७ /२०१८) मोप्र-(२), दिनाक ०९/०५/२०१८ चे सहपत्र
नियत अस्थायी आस्थापनेवरील खालील नमूद ३० पदांना
दिनांक ०१/०३/२०१८ ते ३०/०५/२०१८ पर्यंत मुदतवाढ

अ.क्र.	पदनाम	आकृतिबंधानुसार मंजूर पदे	मुदतवाढ द्यावयाची पदे
	तांत्रिक पदे		
१	मुख्य अभियंता	१	१
२	सहायक मुख्य अभियंता (कार्यकारी अभियंता)	२	२
३	उप अभियंता	३	३
४	कनिष्ठ अभियंता	३	३
५	मुख्य आरेखक	१	१
	अतांत्रिक पदे		
६	विशेष अधीक्षक	१	१
७	अधीक्षक	१	१
८	मुख्य दफतर कारकून	१	१
९	प्रथम लिपिक	१	१
१०	वरिष्ठ लिपिक	२	२
११	कनिष्ठ लिपिक	२	२
१२	स्वीय सहायक/ लघुटंकलेखक	१	१
१३	टंकलेखक	३	३
१४	दूरध्वनीचालक	१	१
१५	वाहनचालक	१	१
१६	दप्तरी	१	१
१७	नाईक	१	१
१८	शिपाई	३	३
१९	चौकीदार	१	१
	एकूण	३०	३०